# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०३/२०२४

डॉ.विनोद विठ्ठल पवार
श्री आनंद रेसिडेन्सी, प्लॅट न.ए १, श्रीनगरी,
तामजाई नगर, सातारा ४१५००२ } तक्रार अर्जदार

विरूध्द्
१. जयवंत प्रतिष्ठान, हुमगांव, ता.जावळी
जि.सातारा
२. आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय,मेढा,
ता.जावळी, जि.सातारा } वि.प.

जयवंत प्रतिष्ठान, हुमगांव, ता.जावळी, जि.सातारा या शिक्षण संस्थेचे आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा, ता.जावळी, जि.सातारा यांचेकडील शिक्षक श्री.विनोद विठ्ठल पवार यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२९/०४/२०२४ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये तक्रारदार यांनी विस्तृत स्वरूपात आपली तक्रार नमूद करून खालील मागण्यांबाबत विनंती आहे.

१. माझ्या दि.०६/०१/२०२३ च्या अर्जाप्रमाणे दि.११/०३/२०२३ या पात्रते दिनांकापासून सहयोगी प्राध्यापक पदाची (AL-13A) स्थाननिश्चिती होवून मिळावी.

२. दि.११/०३/२०२३ या पात्रते दिनांकापासून देय थकीत वेतनावर १८ टक्के व्याजदराने लाभ देण्याचे आदेश महाविद्यालय व्यवस्थापनास व्हावेत.

३. दरम्यानच्या काळात सूडभावनेने दिलेले मेमो बिनशर्त मागे घेण्यात यावेत.

४. महाविद्यालयाच्या उपप्राचार्यांना शिक्षकांचे नुकसान न करणेबाबत समज देणेत यावी.

५. विद्यापीठ आदेशातील "स्थाननिश्चितीस उपस्थित न राहिल्यास परिनियमातील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल" या बाबींची अंमलजावणी व्हावी.

**संस्थेचा अभिप्राय :**

संस्थेकडून सदर तक्रारीबाबत अभिप्राय देण्यात आलेला नाही.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

महाविद्यालयाकडून दि.११/०७/२०२४ रोजी प्राप्त झालेला अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

आमच्या महाविद्यालयातील सहा.प्राध्यापक श्री.विनोद विठ्ठल पवार (भूगोल) यांनी आपल्याकडे दि.२९/०४/२०२४ रोजी तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. डॉ.पवार यांच्या बद्दल जयवंत प्रतिष्ठान हुमगांव या आमच्या संस्थेकडे त्यांच्या गैरवर्तनूकीबद्दल तसेच महाविद्यालयाची व तसेच आमच्या संस्थेची प्रतिमा मलिन करणेबाबत विविध तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्याच्या बद्दलच्या विविध तक्रारींची मा. अध्यक्ष व मा.सचिव यांनी आदेशित केल्याप्रमाणे मा.सचिव जयवंत प्रतिष्ठान, हुमगांव यांनी गंभीर दखल घेतली असून त्यांच्या या गैरवर्तनाबद्दल मा.अध्यक्ष व सचिव यांनी आदेशीत केल्याप्रमाणे मा.प्राचार्य जयवंत प्रतिष्ठान, हुमगांव यांचेव्द्वारे डॉ.पवार यांना अनेक सूचना, समज, मेमो तसेच कारणे दाखवा नोटीस इ. बजावण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्या स्थाननिश्चिती प्रस्ताव मा.व्यवस्थापन यांनी आदेशीत केल्याप्रमाणे पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी तूर्तास स्थगित ठेवण्यात आलेला आहे. याची मा.अध्यक्ष तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी नोंद घ्यावी. डॉ.पवार हे इतर मागासवर्गीय समाजातील असून त्यांच्या बाबतीत संस्थेकडून व महाविद्यालयाकडून दुजाभाव केला जात आहे. अशा स्वरूपाचे आरोप असणारे पत्र दि.०९/०३/२०२३ रोजी डॉ.पवार यांनी महाविद्यालयाला दिले होते. परंतू वास्तविक डॉ.पवार हे ओ.बी.सी. प्रर्वगातील असून सुध्दा डॉ.पवार यांची नेमणूक संस्थेने खुल्या प्रवर्गातून केलेली आहे. हे विशेषत्वाने या ठिकाणी नमूद करावेसे वाटते. त्यामुळे डॉ.पवार यांचे आरोप हे अतिशय बिनबुडाचे व निराधार असल्याचे दिसते. या संदर्भात महाविद्यालयातील स्थायी समितीकडे डॉ.पवार यांचा तक्रार अर्ज आवश्यक ती चौकशी व कार्यवाहीसाठी मा.प्राचार्य यांनी सादर केला होता. सदर समितीची सभा दि.१६/०३/२०२४ रोजी संपन्न झाली व सदर स्थायी समितीच्या सभेमध्ये सर्व सदस्यांनी आमच्या संस्थेत व महाविद्यालयामध्ये जाती पाती विरहीत वातावरण असून कोणत्याही जाती धर्माच्या व पंथाच्या कर्मचा-यांच्या बाबतीत जात, धर्म, वंश, पंथ इत्यादींच्या आधारे कोणताही भेदभाव केला जात नाही, असा एकमताने ठराव पारित केलेला असून, सदर ठरावामध्ये डॉ.पवार यांचे आरोप बिनबुडाचे निराधार असल्याचे आर्वजून नमूद केले आहे.

डॉ.विनोद विठ्ठल पवार यांचा स्थाननिश्चिती प्रस्ताव, तक्रार अर्ज व त्या संदर्भात महाविद्यालयाकडून डॉ.पवार यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

**समितीची निरिक्षणे :**

१. संस्थेतर्फे संस्था अध्यक्ष अथवा प्रतिनिधी या समितीसमोर प्रस्तूतच्या प्रकरणाच्या नेमलेल्या कोणत्याही तारखेस हजर नाहीत. याप्रकरणी समितीसमोर संस्थेतर्फे लेखी अथवा तोंडी म्हणणे मांडण्यात आलेले नाही. सदरचे प्रकरण आज रोजी सुनावणीस घेतले असता समितीपुढे जाबदार शिक्षण संस्थेतर्फे कुणीही अधिकृत प्रतिनिधी किंवा संस्था अध्यक्ष हजर नव्हते. तक्रारदार स्वतः हजर होते आणि त्यांचा युक्तिवाद या समितीने ऐकून घेतला. तक्रारीचे स्वरूप थोडक्यात असे दिसते की, तक्रारदार सहयोगी प्राध्यापक बढतीच्या पदाला

पात्र झाल्यानंतर बढतीकरिता आवश्यक अशा कॅसच्या बैठकीपुढे जाब देणार संस्था आणि महाविद्यालय तक्रारदाराचे प्रस्ताव पाठवत नाहीत आणि कॅसतर्फे जेव्हा वैयक्तिक मुलाखती घेतल्या जातात तेव्हा तक्रारदाराच्या बाबतीत संस्था किंवा महाविद्यालयाचे प्रतिनिधी कॅससमोर हजर राहत नाहीत. ही बाब जाबदारांना मान्य आहे की, तक्रारदाराच्या बढतीचे प्रस्ताव कॅसकडे पाठविण्यात आलेले नाहीत आणि काहीप्रसंगी कॅसच्या मुलाखतीच्यावेळी संस्था अध्यक्ष किंवा महाविद्यालय प्रतिनिधी हजर नव्हते. जाबदेणार यांना तक्रारदाराच्या एकूण कामकाजाबद्दल काही तक्रारी दिसतात आणि त्याकरीता तक्रारदाराला वेळोवेळी महाविद्यालयाकडून देण्यात आलेले मेमो या समितीसमोर हजर करण्यात आलेले आहेत. युक्तिवादा दरम्यान हेसुध्दा समितीसमोर नमूद करण्यात आले की, या मेमोचे अजून उत्तर तक्रारदाराने दिलेले नाही. जाब देणार महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी दि. २७/०६/२०२४ रोजी एक पत्र या समितीस देवून त्यात असे नमूद केलेले आहे की, 'तक्रारदाराच्या स्थाननिश्चितीचा प्रस्ताव महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि संशोधन समिती यांचेकडे सोपविण्यात आला होता. तथापि सदर रिसर्च पेपरबाबत समन्वयक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि समन्वयक अंतर्गत संशोधन समिती यांनी तक्रारदारांनी सादर केलेल्या संशोधन पेपरसंदर्भात अनेक शंका आणि आक्षेप नोंदविले आहेत. सबब तक्रारदारांनी स्थाननिश्चिती प्रस्तावामध्ये सादर केलेल्या प्रसिध्द संशोधन पेपरबाबत या समितीकडून योग्य ते मार्गदर्शन त्यांना मिळावे आणि तोपर्यंत तक्रारदारांचा स्थाननिश्चिती प्रस्ताव पुढील कार्यवाही करण्यासंदर्भात जाबदार तो प्रस्ताव स्थगित करीत आहेत.' या एकाच पत्रावरून समितीच्या निदर्शनास स्पष्टपणे दिसून आले की, कोणत्याही प्रकारे जाबदार तक्रारदारांचा स्थाननिश्चितीचा प्रस्ताव स्थाननिश्चितीकरीता विद्यापीठाकडे पाठवित नाहीत. कारण साधे आहे की, संशोधन पेपरच्या संदर्भात अनेक शंका आणि आक्षेप जर घेत असतील तर त्याबाबत ही समिती काय मार्गदर्शन करू शकेल याच उत्तर युक्तिवादा दरम्यान हजर असणाऱ्या प्राचार्यांना देता आलेले नाही. तसेच आपले लेखी म्हणण्यामध्ये "तक्रारदारांच्या स्थाननिश्चिती प्रस्तावामध्ये अनेक तांत्रिक त्रुटी, आक्षेप व उणिवा दिसून आल्यामुळे व त्या संदर्भात मा.अध्यक्ष, तक्रार निवारण समिती ह्यांचे कडून मार्गदर्शन अपेक्षित असल्याने त्यांचा स्थान निश्चिती प्रस्ताव मा.व्यवस्थापन यांनी आदेशीत केल्याप्रमाणे पुढील अपेक्षित त्या कार्यवाहीसाठी तुर्तास स्थगित ठेवण्यात आलेला आहे." असे म्हटले आहे. ह्या सर्व बाबींबाबत संस्था व महाविद्यालयाने नियमानुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे. स्थाननिश्चितीच्या प्रस्तावामध्ये त्रुटी आढळल्यास छाननी समिती विद्यापीठ प्रशासनाद्वारे महाविद्यालय शिक्षक यांना कळवित असते. सबब स्थाननिश्चिती प्रस्तावाबाबत मार्गदर्शन करणे ही बाब या समितीच्या अखत्यारित येत नाही. वर नमूद केल्याप्रमाणे तक्रारदाराच्या विरुध्द् बरेचसे मेमो दिलेले दिसत आहेत आणि त्याबाबत तक्रारदाराकडून काही स्पष्टीकरण आलेले नाही असे जाबदार महाविद्यालयाकडून या समितीपुढे निवेदन करण्यात आलेले आहे. या सर्व बाबींचा परिणाम तक्रारदाराची स्थाननिश्चिती किंवा पदोन्नती करिता त्यांचा विचार होण्याच्या कायदेशीर हक्कावर गदा आणणारा आहे.

कायद्याचे हे ठाम सूत्र आहे की, कुठल्याही कर्मचाऱ्याला पदोन्नती मिळण्याचा कायदेशीर हक्क नाही. तथापि पदोन्नतीकरिता त्याचा विचार होण्याचा त्याला निश्चित कायदेशीर हक्क आहे. प्रस्तुत प्रकरणात स्थाननिश्चितीचा प्रस्ताव महाविद्यालय आणि संस्था यांचेकडून कॅसकरीता विद्यापीठाकडे पाठविला जातो. त्यासंबंधी विद्यापीठ अनुदान आयोगाचे स्पष्ट निर्देश आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने दि.०८/०३/२०१९ रोजी शासन निर्णय जारी केलेला आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याला पदोन्नती ही कायदेशीर हक्क म्हणून मागण्याचा अधिकार नाही. वर नमूद केल्याप्रमाणे त्याचा हक्क फक्त पदोन्नतीकरिता त्याचा विचार व्हावा एवढयापर्यंत सिमित आहे. जर तक्रारदाराचा स्थाननिश्चितीचा प्रस्ताव संस्थेने आणि महाविद्यालयाने कॅसकडे पाठविला तर त्यावरून कॅस समिती त्याला स्थाननिश्चिती करावयाची किंवा कसे याचा निर्णय घेवू शकेल. तक्रारदार यांनी मागणी केलेनुसार त्यांच्या दि.०६/०१/२०२३ रोजीच्या अर्जाप्रमाणे दि.११/०३/२०२३ या पात्रता दिनांकापासून सहयोगी प्राध्यापक पदाची (AL-13A) स्थाननिश्चिती होवून मिळणेबाबतची मागणी अर्जात नमूद केली आहे. या समितीने अमूक एका प्रकारे निर्णय घ्यावा, स्थाननिश्चिती करावी की नाकारावी हे सांगण्याचा अधिकार या समितीला नाही. तो केवळ आणि केवळ कॅस समितीला आहे. ही बाब जरूर आहे की, कॅस समितीचे अध्यक्ष हे संस्थेचे अध्यक्ष किंवा प्रतिनिधी असतात. तथापि त्या समितीमध्ये इतर सदस्य/तज्ञांचा समावेश असतो आणि ते सर्व या बाबतीत योग्य निर्णय घेवू शकतात. सबब तक्रारदाराचा प्रस्ताव हा कॅस समितीकडे पाठवायचा नाही हे जाबदार संस्था आणि महाविद्यालयाचे धोरण सर्वस्वी अयोग्य आणि बेकायदेशीर आहे आणि ते मान्य करता येत नाही. तसेच संस्था व महाविद्यालय यांनी कॅस समितीसमोर अनुपस्थित राहिलेबाबत कोणतेही सबळ कारण या समितीसमोर सादर केलेले नाही. तक्रारदार स्थाननिश्चितीकरिता पात्र आहेत किंवा नाहीत हे ठरविण्याचा सर्वस्वी अधिकार कॅस समितीस आहे. तसेच विद्यापीठाने स्थाननिश्चिती कॅस अंतर्गत मुलाखतींबाबत संस्था प्रतिनिधी व महाविद्यालय प्राचार्य यांना उपस्थित राहण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके जारी केली आहेत त्यानुसार प्रस्तुत प्रकरणात तक्रारदार यांचा स्थाननिश्चितीचा प्रस्ताव कॅस समितीकडे पाठवण्यात यावा आणि कॅसच्या मुलाखतीच्यावेळीस संस्था अध्यक्ष किंवा प्रतिनिधी आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सक्तीने हजर रहावे असे अनिवार्य करण्यात येत आहे.

२. तक्रारदार यांनी दरम्यानच्या काळात सूडभावनेने दिलेले मेमो बिनशर्त मागे घेण्यात यावेत अशी तक्रार नमूद केली आहे. ही मागणी वर नमूद कारणाकरीता सर्वस्वी अनाठायी आहे. ती मंजूर करता येत नाही.

३. तक्रारदार यांनी दि.११/०३/२०२३ या पात्रता दिनांकापासून देय थकीत वेतनावर १८ टक्के व्याजदराने लाभ मिळणेबाबत महाविद्यालयास आदेश देणेची मागणी नमूद केली आहे. स्थाननिश्चिती बाबत

पदोन्नतीची कार्यवाही कॅस समितीकडून होत असते. त्यामुळे सदरची बाब या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

४. तसेच तक्रारदार यांनी महाविद्यालयाच्या उपप्राचार्यांना शिक्षकांचे जाणीवपूर्वक नुकसान न करणेबाबत समज देणेत यावी अशी मागणी नमूद केली आहे. याबाबत समितीचे मत असे की, संस्था, प्राचार्य, उपप्राचार्य व शिक्षक यांनी महाविद्यालयातील वातावरण सौदार्ह्यपूर्ण राहिल याची दक्षता तिन्ही पक्षांनी घेणे आवश्यक जेणेकरून शिक्षणाचा उच्च दर्जा कायम राहिल.

५. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये विद्यापीठ आदेशातील "स्थाननिश्चितीस उपस्थित न राहिल्यास परिनियमातील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येईल" या बाबींची अंमलजावणी व्हावी. अशी मागणी नमूद केली आहे. स्थाननिश्चितीचे कॅम्प विद्यापीठाच्या संबधित विभागाकडून आयोजित केले जातात. तसेच याबाबत कार्यवाहीचे अधिकार हे संबधित विभागास असून परिनियमातील तरतूदीनुसार त्यांचेकडून कार्यवाही केली जाते.

समिती खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. तक्रारदाराचा स्थानिनिश्चितीचा प्रस्ताव जाबदार संस्था आणि महाविद्यालयाने स्थाननिश्चितीकरीता विद्यापीठाकडे विनाविलंब पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात यावा.

२. तक्रारदारांच्या स्थाननिश्चिती समितीसमोरील मुलाखती वेळेस संस्था अध्यक्ष व महाविद्यालय प्राचार्य यांनी हजर रहावे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 12 AUG 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)